शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर, यांचे कार्यालय

सक्करदरा चौक, उमरेड रोड, नागपूर

गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरती बाबत जाहिरात

email- govt.Ayurved Hospital@yahoo.com
दुरध्वनी/फॅक्स-(०७१२)२७४६६३१

जा.क्र.शाआरुना/आस्था-४/गट-ड/ पदभरती/४००५/२०१२ दिनांक :- ३०/११/२०१२.

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांचे आस्थापनेवरील गट-ड संवर्गातील रिक्त असलेल्या पदाच्या भरतीसाठी विहित अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून लेखी परीक्षेसाठी या जाहिरातीव्दारे दिनांक ०३/११/२०१२ ते दिनांक २२/११/२०१२ अखेर (शासकीय सुटीचे दिवस वगळून) सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. पदांच्या एकुण संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार मा. अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांनी राखून ठेवलेले आहेत.

शासकीय आयुर्वेद रुग्णालय,नागपूर

अ. क्रं.	पदाचे नाव	पदांची संख्या	समाजिक आरक्षणाची पदे	अपंग आरक्षणाची पदे	वेतनश्रेणी	आवश्यक शैक्षणिक अर्हता
१	सहा. स्वंयपाकी	०१	अ.जा.	०	४४४०-७४४० ग्रेड पे १३००/-	किमान ४ था वर्ग उत्तीर्ण
२	न्हावी	०१	एकाकी	०	४४४०-७४४० ग्रेड पे १६००/-	किमान ४ था वर्ग उत्तीर्ण

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर

अ. क्रं.	पदाचे नाव	पदांची संख्या	समाजिक आरक्षणाची पदे	अपंग आरक्षणाची पद	*शारिरीक पात्रता	वेतनश्रेणी	आवश्यक शैक्षणिक अर्हता
१	सेवक	०२	०१ पद इ.मा.व.	०१ पद अल्पदृष्टी, L.V.	S,ST,W,L,BN, PP,SE,H,RW,	४४४०-७४४० ग्रेड पे १३००/-	किमान ४ था वर्ग उत्तीर्ण
२	सफाईगार	०१	०	०१ पद अल्पदृष्टी,L.V.	ST,L,SE,	४४४०-७४४० ग्रेड पे १३००/-	किमान ४ था वर्ग उत्तीर्ण

*(Abbreviation used – S-Sitting, ST-Standing, SE-Seeing, RW-Reading & Writing, W-Walking, PP-Pulling & Pushing, BN-Bendibg, H-Hearing, L-Lifting)

*अल्पदृष्टी (**Person with low vision**) – Means a person with impairment of visual functioning even after treatment or standard refractive correction, but who uses or is potentiall capable of using vision for the planning or execution of a task with appropriate assistive device.

टिप :- १) **शासन, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१२/प्र.क्रं. १८६/१२, दिनांक २५.०७.२०१२ नुसार मंजुर पदांच्या प्रतिवर्षी कमाल तीन टक्के इतक्या मर्यादेपर्यंतच रिक्त पदे भरण्याचे निर्देश दिलेले आहेत.**

२) **मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे दाखल याचिका क्रं. ३०७५/२०१० च्या अधिन राहुन पदभरती करण्यात येत आहे.**

१) **शैक्षणिक अर्हता:**

१.१) मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक.

२) **वयोमार्यादा:**

२.१) अर्ज करण्याचे अंतिम दिनांकास उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

२.२) **उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम:**

अ) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत.

ब) अपंग उमेदवारांच्या बाबतीत ४५ वर्षापर्यंत.

३) **परीक्षा शुल्क:**

३.१) खुल्या संवर्गातील उमेदवाराने रु.४००/- चा आणि मागासवर्गीय उमेदवारांनी रु.२००/-चा राष्ट्रीकृत बॅकेचा डिमांड ड्राफट ((Dean,Government Ayurved collage & Hospital, Ngpur) यांचे नावाने काढण्यात यावा. तसेच मागासवर्गीय उमेदवारांनी जातीच्या प्रमाणपत्राची प्रत जोडणे बंधनकारक राहील.

४) **परीक्षेचे स्वरुप:**

४.१) पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा महाराष्ट्र राज्य, पाठयपुस्तक निर्मिती मंडळ इयत्ता चौथी वर्गाच्या स्तरावरील सामान्य ज्ञान व इतर क्रमिक पुस्तके/अभ्यासक्रमावर आधारीत राहील. ही प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी (**Objective**) स्वरुपाची राहील. ही प्रश्नपत्रिका ७५ गुणांची, ७५ प्रश्नांची व ७५ मिनटांची असेल. तसेच सदर परीक्षा मराठी माध्यमातून घेतली जाईल.

४.२) उमेदवारांस लेखी परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांची अगर **उत्तरपत्रिकेची फेरतपासणी/पडताळणी करण्याची तरतूद नाही.**

४.३) परीक्षेचा निकाल तयार करतांना ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं/२००७/प्र.क्रं. ४६/०७/१३-अ, दिनांक २७.६.२००८ मधील मुद्या क्रमांक ६ मध्ये दिलेल्या निकषावर लावला जाईल.

५) अर्ज सादर करणेबाबत आवश्यक सुचना:

५.१) संपुर्ण महाराष्ट्र राज्यातील आवश्यक अर्हताप्राप्त करणारा कोणताही उमेदवार अर्ज करु शकेल.

५.२)मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक.

५.२) प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे व प्रत्येक अर्जाकरीता स्वतंत्र परीक्षा शुल्काचा डिमांड ड्राफट करणे बंधनकारक आहे. अन्यथा कार्यालयाकडून कोणत्याही पात्र एका पदासाठी अर्ज गृहीत धरण्यात येईल. त्यात पुन्हा कोणताही बदल करता येणार नाही.

५.३) अर्जासोबत इयत्ता ४ थी वा त्यापुढील शैक्षणिक अर्हतेची गुणपत्रिका जोडावी.

५.४) उमेदवारांनी इतर शैक्षणीक अर्हता यामध्ये त्यांचेकडे असलेल्या इतर शैक्षणिक अर्हतेचा उल्लेख करावा.

५.५) जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार कार्यालयात नावनोंदणी केली असल्यास त्याचा नोंदणी क्रमांक व दिनांक अर्जामध्ये नमूद करावा.

६) सर्वसाधारण अटी व शर्ती:

६.१) उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्जावरच विहीत ठिकाणी अलीकडील काळातील एक पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा व फोटोवर स्वत:ची स्वाक्षरी करावी. फोटोच्या पाठीमागे स्वत:चे नाव असावे.

६.२) अर्जासोबत रु. ५/- चे तिकिट लावलेला १२ सें.मी. × २३ सें.मी. या आकाराचे स्वत:चा पत्ता लिहिलेले दोन लिफाफे सोबत जोडावे.

६.३) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असावा.उपरोक्त बाबत शासनाने वेळोवेळी विहित केलेले सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

६.४) शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या ते सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयाच्या नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र घेवुन अर्ज सादर करावे.

६.५) शासन निर्णय दिनांक १३ जानेवारी २००९ नुसार अनुसूचित जाती व जमाती वगळता विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यामधील उमेदवारांनी आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षाचे (नॉन र्किमीलेअर) प्रमाणपत्र जोडावे.

६.६.) महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्रं. अनियो -१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ नुसार दिनांक १ नोव्हेंबर २००५ नंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नविन अंशादायी परीभाषीत निवृत्ती वेतन योजना लागु राहील. तथापि सध्याची सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ तसेच म.ना.से. (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ लागू होणार नाही.

६.७) सदरहू जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

६.८) परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण यात बदल करणे, परीक्षा स्थगित करणे/अंशतः बदल करणे इत्यादीबाबतचे सर्व अधिकार हे अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर स्वतःकडे राखुन ठेवत आहेत. याबाबत कोणालही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

६.९) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्रं. १६४/२०११/१६-ब,दिनांक १२/१२/२०११ अन्वये मागासवर्गीय उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन ६ महिन्याच्या आत आपल्या जात/जमाती प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे बंधनकारक आहे.

६.१०) शासनाने विहीत केलेली शारीरिक पात्रता प्रमाणपत्र व चांगली वर्तणूक असल्याचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.

६.११) या उमेदवारांनी सेवायोजन कार्यालय/समाजकल्याण अधिकारी/एकात्मिक आदिवासी प्रकल्प अधिकारी इत्यादी कार्यालयांमध्ये नावे नोंदविलेली आहेत, अशा उमेदवारांनीही या जाहिरातीनुसार अर्ज करणे आवश्यक राहील.

६.१२) अपंग प्रवर्गासाठी अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांकडे अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० % असलेबाबतचे सक्षम वैद्यकीय त्रिसदस्यीय समिती/वैद्यकीय मंडळाने प्रमाणित केलेल्या अपंगत्वाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

६.१३) सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रं. अपंग-१००९/प्र.क्रं. २७६/०९/१६-अ, दिनांक १९.०३.२०१० नुसार अपंग प्रवर्गातील उमेदवार ज्या प्रवर्गातील असेल त्या प्रवर्गात त्यास सामावून घेण्यात येईल.

६.१४) फक्त कायम स्वरुपाचे अपंगत्व असलेल्या उमेदवारांनाच अपंग व्यक्तीसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचे व वयोमार्यादेतील सवलतींचे फायदे देय राहतील. तात्पुरत्या स्वरुपातील अपंगत्वाचे प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांना अपंग व्यक्तींसाठी असलेले कोणतेही फायदे देय नाहीत.

६.१५) ज्या अपंग उमेदवारांना लेखी परिक्षेचे वेळी मदतनिसाची आवश्यकता असल्यास आवेदन पत्रासोबत तसा स्वतंत्र अर्ज करावा व कोणास परवानगी द्यायची याचे पुर्ण अधिकार मा. अधिष्ठता यांचे राहतील. त्यासाठी ८ दिवस आधी खात्री करुन घ्यावी.

६.१६) गुणवत्ता, संवैधानिक आरक्षण, सामाजिक व अन्य आरक्षण यानुसार निवड प्रक्रियेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनी कार्यालयाकडे सादर केलेल्या अर्जातील माहिती त्यांच्या मुळ कागदपत्रावरुन पडताळून पाहिली जाईल. या पडताळणीमध्ये अर्जात भरलेली माहिती व मूळ कागदपत्रे यात तफावत आढळल्यास उमेदवार निवडीसाठी अपात्र ठरेल.

६.१७) परीक्षेला उपस्थित राहण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च अनुज्ञेय नाही.

६.१८) ज्या उमेदवाराला लेखी परीक्षेचे प्रवेशत्र मिळणार नाही त्यांनी परीक्षेच्या दोन दिवस आधी कार्यालयाशी (अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, राजे रघुजी नगर, नागपूर) येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा.

६.१९) टपाल वितरण प्रक्रियेतील विलंबाचे परिणामी अर्ज उशिरा पोहचल्यास किंवा उमेदवारास ओळखपत्र /मुलाखत पत्र उशीरा मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

७) अर्ज छाननी

७.१) अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांना जरुरीप्रमाणे व शासन निकषानुसार लेखी परीक्षेस/व्यावसायीक चाचणी/मुलाखतीस बोलविण्यात येईल. त्याबाबतचा पत्रव्यवहार स्वतंत्ररित्या करण्यात येईल व अशा पत्रव्यवहारात नमूद केलेल्या ठिकाणी उमेदवारांना लेखी परीक्षा/व्यावसायीक चाचणी/मुलाखतीसाठी स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

७.२) विहीत मुदतीत प्राप्त अर्जांपैकी छाननी अंती अपात्र आढळून आलेल्या उमेदवारांचा पुढील प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

८) सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) तसेच आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे संकेतस्थळावर (www.mahayush.gov.in) तसेच शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर कार्यालयात उपलब्ध आहे वरील पदावर निवड/नियुक्ती होणाऱ्या उमेदवारांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागु राहतील.

८) अर्ज पाठविण्याचा पत्ता:-

उमेदवारांनी विहित नमुन्यात आवेदन पत्र भरुन अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, राजे रघुजी नगर, नागपूर-४४४०२४ या पत्त्यावर दिनांक २२/११/२०१२ रोजी सायंकाळी ५.०० वा. पर्यंत किंवा तत्पुर्वी पाठवावे. उशिरा आलेल्या व अपूर्ण असलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर
गट-ड संवर्गातील पद भरतीसाठी अर्ज

महात्वाच्या सुचना: १) अर्ज भरण्यापूर्वी खालील व पुढील पानावर दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात. २) खालील माहिती मराठी मध्येच भरावी ३) अर्जाची घडी करु नये. ४) अर्ज भरण्याकरीता काळया अथवा निळया बॉलपेनचाच वापर करावा. ५) रिक्त पदे असलेल्या प्रवर्गातूनच अर्ज करावेत. ६) अर्जासोबत केवळ राष्ट्रीयकृत बॅंकेचा धनाकर्ष (DD) जोडावा. ७.अर्जदारास फक्त एका पदासाठी एकच अर्ज करता येईल.

पदनाम	आवक नोंदवहीतील क्रमांक	अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक

प्रति,
अधिष्ठता
तथा अध्यक्ष, भरती प्रक्रिया निवड समिती,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय,
नागपूर - ४४००२४.

कृपया येथे पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवुन त्यावर स्वत:ची स्वाक्षरी करावी.

१. अर्जदाराचे आडनाव:- .....
२. नाव :- .....
३. वडीलांचे/पतीचे नाव:- .....
४. आईचे नाव:- .....

टिप:- अर्जदाराच्या मुळ नावात बदल झाला असेल
तर अर्जदाराचे मुळ संपुर्ण नाव.....

५. वैयक्तिक माहिती
अ. जन्मतारीख (अंकामध्ये)

तारीख	महिना	वर्ष

ब. दिनांक:- / /२०१२ रोजीचे वय

वर्ष	महिना	दिवस

६. संपूर्ण पत्ता :-

_____
_____
जिल्हा_____
पिन कोड._____
दुरध्वनी क्रं._____
मो.क्रं._____
जवळच्या व्यक्तीचा
मो.क्रं._____

७. अर्जदाराची शैक्षणिक अर्हता:-

इयत्ता उत्तीर्ण	परीक्षा मंडळाचे/शाळेचे नाव	परीक्षा उत्तीर्ण होण्याचे वर्ष	एकूण गुण	प्राप्त गुण	टक्केवारी

८. आरक्षणाचा प्रकार :- अर्जदार ज्या प्रवर्गातील असेल त्या प्रवर्गाच्या रकान्यात ✓ खुण करावी.

अ. सामाजिक प्रवर्ग :-

अ.जा.	अ.ज.	वि. जा. (अ)	भ.ज. (ब)	भ.ज. (क)	भ.ज. (ड)	वि.मा.प्र.	इ.मा.प्र	खुला

९. अपंग असल्यास प्रकार :-

१०.अपंगत्वाचे प्रमाण :-

११. परीक्षा फी **DD** धनाकर्ष (केवळ राष्ट्रीयकृत बॅंकेचा)

DD /धनाकर्ष क्रं.	तारीख	रक्कम	बॅंक आणि शाखेचे नाव

१२. अर्जासोबत जोडावयाचे सांक्षाकीत प्रमाणपत्रे: (लागु असेल तेथे ✓ अशी खुण करावी.

१. शाळा सोडल्याचा दाखला
२. अर्जदाराचे सध्याचे नाव प्रमाणपत्रवरील/मुळ नावात फरक असल्यास पुराव्यासाठी प्रमाणपत्र/राजपत्र
३. शैक्षणिक पात्रता गुणपत्रके
४. अधिवास प्रमाणपत्र.
५. जात प्रमाणपत्राची छायाप्रत (झेरॉक्स) प्रत.
६. असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची छायाप्रत (झेरॉक्स) प्रत.
७. २०१२-२०१३ चे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र
८. अपंग असल्याचे प्रमाणपत्र
९. सेवायोजन/जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार कार्यालयात नोंदणी असल्यास प्रमाणपत्र
१०. जन्म दिनांकाचा पुरावा

११. शासकीय सेवकांसाठी कार्यालय प्रमुखाचा ना हरकत प्रमाणपत्र.
१२. इतर

प्रमाणित करण्यात येते की, अर्जात नमूद केलेली माहिती सत्य असून, माहिती खोटी अथवा चुकीची आढळल्यास माझी उमेदवारी निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द ठरेल याची मला पूर्ण जाणीव असून, मी पुढील योग्य त्या कार्यवाहीस पात्र ठरेन. तसेच अर्जातील बाबी परिपूर्ण नसल्यास आणि अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती खऱ्या नसल्याचे आढळून आल्यास माझा अर्ज नाकारण्यात येईल व याबाबत मला कोणताही आक्षेप राहणार नाही.

दिनांक :

उमेदवाराची स्वाक्षरी

ठिकाण :

म्हाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील

प्रतिज्ञापन नमुना - अ

प्रतिज्ञापन

नमुना - अ

(नियम ४ पहा)

मी श्री./श्रीमती/कुमारी.....
श्री .....यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी,
वय.....वर्षे,राहणार,.....यांव्दारे पुढील प्रमाणे
असे जाहीर करतो/करते की,

१)मी.....या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२)आज रोजी मला.....(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या..... आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)

३)हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००५
व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

सही

दिनांक :-

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर

गट - ड संवर्गातील पदभरती

प्रवेशपत्र

फोटो

उमेदवाराचा बैठक क्रमांक :- .....

उमेदवाराचे :- नाव.....

प्रवर्ग :- .....

आरक्षण :- .....

परीक्षा दिनांक :-

वेळ :- .....

परीक्षा केंद्राचे नाव व पत्ता :- .....

.....

उमेदवाराची स्वाक्षरी

उमेदवारासाठी पोचपावती

उमेदवाराचा बैठक क्रमांक :- .....,

उमेदवाराचे नाव :- .....,

प्रवर्ग :- .....

आरक्षण :- .....

परीक्षा दिनांक :-

वेळ :- .....

परीक्षा केंद्राचे नाव व पत्ता :- .....

.....